| MHKO070010832019 | नियमीत दिवाणी दावा क्र.२७०/२०१६ मधील<br>नि.क्र.३२ खालील आदेश<br>(नरसू अण्णू बोगदे (मयत वारस)<br>अ.श्रीमती संगीता नरसू बोगदे, वगैरे<br>–विरुध्द–<br>(विनोद कल्लाप्पा कोळी) |
|---|---|

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी त्यांचेविरुध्द झालेला पुरावा नाहीचा आदेश रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. त्यास प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागेच म्हणणे देवून अर्जातील सर्व कथने चुकीची व खोटी असून ती त्यांना मान्य व कबुल नसल्याचे कथन करुन प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जातील कथने ही वादी यांनी शपथेवर कथन केलेली असली तरी वादी यांच्या अर्जामध्ये नमुद कारणांचे अवलोकन करता अर्जामध्ये नमुद केलेले कारण हे समाधानकारक दिसून येत नाही. परंतु सदरकामी निघालेल्या मुद्दयांचे अवलोकन करता त्याच्या शाबीतीची जबाबदारी वादीवर असल्याचे दिसून येते. त्यामुळे वादीला नैसर्गिक न्याय तत्वाचा विचार करता वादी यांना पुढील पुरावा देणेस संधी देणे योग्य व न्यायोचित वाटते. जर वादी यांना पुढील पुरावा देणेस परवानगी न दिलेस तर त्यांचा पुरावा देणेचा हक्क नाकारल्यासारखे होईल. शिवाय वादी यांचा पुढील पुरावा अभिलेखावर आल्यास प्रस्तुत प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान संभवत नाही. उलट वादीच्या पुढील पुराव्याने दावा हा गुणदोषावर निर्णीत करणेसाठी उपयुक्त ठरणार आहे. परंतु त्याच बरोबरीने वादी यांनी पुढील पुरावा देणेस झालेला विलंब दुर्लक्षीत करत येणार नाही. सदर विलंबाची भरपाई वादी यांचेवर योग्य तो खर्च आकारुन करणे न्यायोचित होईल. करिता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## – आदेश –

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.३२) रक्कम रु.३००/- च्या खर्चावरती मंजूर करण्यात येतो.

२. सदर खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना देणेत यावी.

PATIL MAYUR SAMPAT
Digitally signed by PATIL MAYUR SAMPAT
Date: 2026.01.22 17:32:47 +0530

दि.२२/०१/२०२६

**(एम. एस. पाटील )**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर